


ग्रंथमित्र डॉ. शिवाजीराव चव्हाण विद्यार्थी निर्मित

# साहित्य कला विकास प्रतिष्ठान, सातारा

## संशोधक पुरस्कार

**डॉ. रणधीर शिंदे,**

समृद्ध परंपरा असणाऱ्या साहित्य कला विकास प्रतिष्ठान चा सन २०१९ चा 'ग्रंथमित्र डॉ. शिवाजीराव चव्हाण संशोधक पुरस्कार' आपणास प्रदान करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

मराठी समीक्षेच्या प्रांतात उत्तम संशोधन वृत्ती, चिकाटी व अभ्यास करणारे तत्वनिष्ठ अभ्यासक म्हणून आपली महाराष्ट्रभर ख्याती आहे. कविता हा आपला आवडता प्रांत. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या समग्रकवितांचा आपण अभ्यास केलात आणि अभ्यासपूर्ण प्रबंध सादर केलात, शरदचंद्र मुक्तीबोध: व्यक्ती आणि वाङमय या ग्रंथातून आपण समीक्षेचा नवा आकृतीबध बांधलात.

आपण मर्ढेकरांच्या कवितेला आणि शैलीला राष्ट्रीय उंची मिळवून दिलीत, संत कवितेतील बोद्ध प्रभाव ही रचना हजारो वर्षांची हडप्पा संस्कृती शोधणारीच आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ह्या महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळाच्या संपादन ग्रंथात आपण मोलाची भूमिका बजावलीत, संपूर्ण महाराष्ट्रभर नवा विचार, नवी धारणा आणि परीवर्तन यासाठी आपण प्रबोधन व मार्गदर्शन करीत आहात. आपल्या या कार्यास आपल्या लेखणीच्या सामर्थ्यास उदंड बळ मिळावे म्हणून साहित्य कला विकास प्रतिष्ठानचा पुरस्कार आपणास आम्ही सन्मानपूर्वक प्रदान करीत आहोत.

आपले नम्र

प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे — कार्यवाह
प्रा. डॉ. सौ. सुनीता उत्तेकर — उपाध्यक्ष
ॲड. डॉ.डी.व्ही.देशपांडे — अध्यक्ष

श्री. एल. ए. पाटील — सदस्य
डॉ. श्री. राजेंद्र माने — सदस्य
सौ. सुनीता कदम — सहकार्यवाह
श्री. प्रदीप कांबळे — कोषाध्यक्ष

रविवार, दि. ७ एप्रिल २०१९